॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १५ जुलै २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय 'कुलगुरू युवा प्रेरणा शिबिर-२०२६' अंतर्गत पर्यावरण संवर्धन व जनजागृतीचा संदेश देण्यासाठी कुलगुरू प्रा व्ही एल माहेश्वरी यांच्या उपस्थितीत आज बुधवार दि. १५ रोजी विद्यापीठ परिसरात विद्यार्थी भवन ते ग्रंथालय अशी वृक्षदिंडी काढण्यात आली.

पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि शाश्वत विकासाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या वृक्षदिंडीत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी स्वतः सहभागी होत विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सकाळ यिन नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात विद्यापीठ परिसरात १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ परिसरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रवीण महाले, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील, वित्त व लेखा अधिकारी रवींद्र पाटील, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक प्रा. चंद्रशेखर वाणी, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक, संघ व्यवस्थापक, विविध महाविद्यालयांचे कार्यक्रम अधिकारी, विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी तसेच शिबिरात सहभागी झालेले सुमारे २५० स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असल्याचा संदेश देत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन मान्यवरांनी केले. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

**बातमी नं.२**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस अंतर्गत इन्क्युबेट असलेल्या परिवर्तन इनोव्हेशन्स प्रा. लि. चे संस्थापक निखिल जाधव यांना यशवंतराव चव्हाण सेंटर तर्फे मानाचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा इनोव्हेटर पुरस्कार २०२५-२६' प्रदान करण्यात आला.

हा प्रतिष्ठेचा पुरस्कार खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संशोधन, तंत्रज्ञान विकास, हरित तंत्रज्ञानाचा प्रसार आणि शाश्वत वाहतूक उपाययोजना विकसित करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला.

केसीआयआयएलच्या इन्क्युबेशन कार्यक्रमांतर्गत या स्टार्टअपला तांत्रिक मार्गदर्शन, उद्योग क्षेत्राशी जोडणी, अनुभवी मेंटर्सचे मार्गदर्शन, व्यवसाय विकास, गुंतवणूक संपर्क तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने सहकार्य करण्यात आले आहे. या सहाय्यामुळे स्टार्टअपने आपल्या तंत्रज्ञानाचा विकास करून व्यावसायिक वाढीच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती साधली आहे.

निखिल जाधव यांना प्राप्त झालेला हा राज्यस्तरीय सन्मान हा केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचा गौरव नसून केसीआयआयएलच्या नवोपक्रम, इन्क्युबेशन आणि उद्योजकता विकासाच्या प्रयत्नांचेही यशस्वी फलित आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल कुलगुरू तथा केसीआयआयएलचे अध्यक्ष प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, संचालक डॉ. राजेश जवळेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन बी. खंडारे यांनी निखिल जाधव यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १५ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता